REGISTERED No. B 3434

जाहीरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी
व्यवस्थापक, अर्थ,
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशील माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे

वर्ष ७ पुणें, बुधवार, तारीख २५ जून, १९४१ अंक २६

सर्व तऱ्हेचें कापड छपाई व रंगाई (Calico Printing and Dyeing) करणारा कारखाना.

' पायोनियर डाइंग हाऊस '

कोचाचें कापड (Casement cloth), दाराचे पडदे, टेबल कव्हर इ. टिकाऊ रंगाचे, स्वदेशी तयार मिळतात. कारखानाः—
भिकारदास मारुती रोड, दातेवाडी, पुणें.

रक्तवर्धक




अत्यंत शक्तिवर्धक

रक्तवर्धक

आयुर्वेद रसशाळा
पुणें लि. पुणें ४.

दि सदर्न निटिंग वर्क्स, लि.

[ २६४ शनिवार, पुणें २. ]

यांनीं बनविलेली



"पूना होजिअरी"

उन्हाळ्यासाठी गंजीफ्रॉक, अंडरवेअर्स वगैरे हरतऱ्हेचा

जाळीचा माल

तयार होत आहे

आपल्या व्यापाऱ्याकडे चौकशी करा

★

ठेवी : मुदतीप्रमाणें ४॥ ते ६ टक्के व्याजानें स्वीकारल्या जातात.

★

माहितीसाठी वरील पत्त्यावर लिहा.

# विविध माहिती

### हिंदी व ब्रिटिश लष्करी अधिकारी

हिंदी व ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांचा अधिक निकट संबंध यावा, ह्यासाठी बंगलोर येथें शिक्षण घेत असलेले १०० ब्रिटिश अधिकारी मह्‌ येथें व मह्‌ येथें शिक्षण घेत असलेले १०० हिंदी अधिकारी बंगलोर येथें पाठविण्यांत आले आहेत.

### जर्मनीची कबुली

आयर्लंडमध्यें ३१ मार्च रोजीं बाँब टाकून प्राणहानी व मालमत्तेचें नुकसान केल्याबद्दल जर्मनीनें खेद व्यक्त केला असून त्याचें नुकसान भरून देण्याचें कबूल केलें आहे.

### टपालाचा नाश

ब्रह्मदेशाचें २१ जानेवारी ते १ फेब्रुवारी ह्या मुदतींतील ग्रेट ब्रिटनकडे जाणारें टपाल शत्रूच्या कारवायांमुळें नाश पावलें आहे, असें जाहीर करण्यांत आलें आहे.

### युद्धकर्ज

हिंदी युद्धकर्जाचा आकडा ६० कोटि रुपयांवर गेला आहे.

### दुग्धपान

प्रत्येक हिंदी मनुष्य दररोज सरासरीनें ६.६ औंस दूध पितो. इतर देशांतील सरासरी ह्याच्या किमान पांच पट आहे. सिंधमधील सरासरी २२ औंस व पंजाबमधील १८.७ औंस आहे. आसाममधील सरासरी सर्वांत कमी म्हणजे १.२ औंस आहे. शहरांतील लोक खेडेगांवांतील लोकांपेक्षा अधिक दूध पितात. दुभत्या जनावरांची संख्या हिंदी लोकसंख्येचे प्रमाणांत वाढत नसल्यामुळें दूध पिण्याचें प्रमाण कमी होत चाललें आहे. वरील आकड्यांत दुधामध्यें तुपाचाहि समावेश केलेला आहे.

### नवीन चलनी नोटा

नवीन जरा मोठ्या आकाराच्या एक रुपयाच्या नोटा लवकरच व्यवहारांत खेळूं लागतील. त्यांची लांबी ४ इंच व रुंदी २३⁄४ इंच राहील.

### आगबोटींचा नाश

मे महिन्यामध्यें ब्रिटिश व दोस्त राष्ट्रांची मिळून ४ लक्ष, ६१ हजार टनांच्या ९८ आगबोटींचा नाश झाला. मार्च व एप्रिल महिन्यांतील नाशापेक्षा हा नाश बराच कमी आहे. १० मे ते १० जून ह्या मुदतींत शत्रूच्या सुमारें ३ लक्ष टनांच्या आगबोटी बुडाल्या.

### लाहोर

लाहोर शहराची लोकसंख्या १९३१ मध्यें ४ लक्ष होती, ती आतां ६ लक्ष, ३२ हजार झाली आहे.

### मि. बी. जे. पादशहा

मि. बी. जे. बादशहा हे आपल्या वयाच्या ७७ व्या वर्षी मुंबई येथें मरण पावले. मि. जमशेटजी टाटांचा ते उजवा हात असून, टाटा आयर्न अँड स्टील कंपनीचें काम ते प्रारंभापासून १९३१ पर्यंत पहात होते.

### बेल्जमध्यें अन्नाचा तुटवडा

युरोपांतील सर्व देशांपैकी बेल्जममध्यें अन्नपुरवठा अत्यंत असमाधानकारक आहे. युद्धाचे पूर्वी प्रत्येकाचे वाट्यास जेवढा पुरवठा येत असे, त्याच्या आतां अर्धा ते पाऊण हिस्सा फक्त येतो.

### पावसाचा अंदाज

गुजराथ, कोंकण, महाराष्ट्र, मध्यप्रांत, हैद्राबाद, इत्यादि ठिकाणीं पाऊस नेहमीच्या सरासरीच्या पावसाचे ९०% पर्यंत पडेल, असा हवामान खात्याचा अंदाज आहे.

### म्युनिसिपॅलिट्यांचा उत्पन्न-खर्च

१९३९–४० मध्यें मुंबई प्रांतांतील म्युनिसिपॅलिट्यांचें एकूण उत्पन्न २ कोटि, २३⁄४ लक्ष रुपये झालें व खर्च २ कोटि, २३⁄४ लक्ष रुपये झाला. १९३८–३९ चे तत्सम आकडे अनुक्रमें २ कोटि, ४ लक्ष व २ कोटि २३⁄४ लक्ष, असे आहेत.

### हिंदुस्थानांत चिनी बँकांच्या शाखा

आतांपर्यंत हिंदुस्थानांत एकहि चिनी बँकेची शाखा नव्हती. बँक ऑफ चायना व बँक ऑफ कम्युनिकेशन्स ह्या दोन चिनी बँकांच्या शाखा कलकत्ता येथें लवकरच सुरू होणार आहेत, असें समजतें.

### वाचकांची आवड

कलकत्ता येथील इंपीरिअल लायब्ररींतून वाचनासाठीं नेलेल्या पुस्तकांची छाननी केली असतां, वाङ्मयाचीं पुस्तकें सर्वांत लोकप्रिय असलेलीं आढळतात. त्याचे खालोखाल इतिहास व कायदा हे विषय येतात. भूगोल आणि प्रवासवर्णनें ह्यांचा अनुक्रम चौथा लागतो. भूगर्भशास्त्राचा नंबर नंतर येतो.

### हिशेब तपासनीसांचें सल्लागार मंडळ

युद्धविषयक कंत्राटांतील अटी, पैसे देण्याची पद्धति, उत्पन्नाची किंमत काढतांना विचारांत घ्यावयाचे मुद्दे, नफ्याचें प्रमाण, कंत्राटदारांचे हिशेबाची तपासणी इत्यादींचे संबंधांतील प्रश्नांवर हिंदुस्थान सरकारास सल्ला देण्याकरितां सरकारनें दहा प्रमुख अकौंटंट्सचें एक सल्लागारमंडळ नेमलें आहे. त्यांत मुंबईच्या मेसर्स फर्ग्युसन अँड कंपनीचे मि. व्हिटबी, मेसर्स बिलिमोरिआ अँड कंपनीचे सर शापुरजी बिलिमोरिआ व मेसर्स के. एस. अयर ॲन्ड कंपनीचे मि. बी. के. एस. अयर हीं नांवें आहेत. सल्लागार मंडळाची पहिली सभा ता. १४ जुलै रोजीं दिल्ली येथें भरेल.

### युद्धकैदी

ब्रिटिशांच्या ताब्यांत सुमारें २ लक्ष, ४४ हजार इटालियन युद्धकैदी आहेत. इटालिअन फौजांबरोबर लढणाऱ्या आफ्रिकन सैनिकांपैकीहि ६६ हजार युद्धकैदी झाले आहेत.

### हिंदुस्थानांतील कारखाने

| | १९३८ | १९३९ |
|---|---|---|
| कारखान्यांची संख्या | १०,७९२ | ११,६३० |
| कामगारांची संख्या | १७,३७,७५५ | १७,५१,१३७ |
| कपास कापडाच्या गिरण्यांतील कामगार | ५,१२,२२८ | ४,८८,५५४ |
| तागाच्या गिरण्यांतील कामगार | २,९५,१६२ | २,९८,९६७ |
| अपघातांची संख्या | ३३,४९४ | ३६,००६ |
| प्राणघातक अपघात | २१० | २२१ |
| किरकोळ अपघात | २७,२२० | २९,९४८ |
| जबर अपधात | ६,०६४ | ५,८३७ |
| अपघातांचें दर लक्ष कामगारांशीं प्रमाण | १,९२७ | २,०५६ |

### नवे कारखाने

१९३९ सालीं हिंदुस्थानांत जेवढे कारखाने व कामगार होते, तितके ते ह्यापूर्वी कधींच नव्हते. १९३९सालीं महत्त्वाचे पुढील नवे कारखाने निघाले:—ओरिसामध्यें कागद कारखाना, लाहोर येथें आगपेट्यांचा कारखाना, रावळपिंडी येथें तेलाचा कारखाना, मोटार टायर्सचा मुंबई येथें कारखाना, व वनस्पतिजन्य तुपाचा संयुक्त प्रांतांत कारखाना.

अनुक्रमणिका


| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ३०२ |
| २ जर्मनीची रशियावर स्वारी ... ... | ३०३ |
| ३ हिंदी मुहमुगाचें पीक | ३०४ |
| ४ स्फुट विचार ... | ३०५ |
| तुर्कस्तान व जर्मनी ह्यांचा करार–कराराचें रहस्य-हिंदी मालकीच्या आगबोटी बांधण्यास प्रारंभ–इंडियन प्रोग्रेसिव्ह इं. कं. लि.–हैद्राबाद संस्थानांतील सहकारी चळवळ | |
| ५ कापडाच्या गिरण्यांतील रात्रपाळी ... ... | ३०७ |
| ६ विचारप्रवर्तक सहकारी बातम्या ... | ३०८ |
| ७ १९३९–४० हें वर्ष शेतीस कसें गेलें ? ... | ३०८ |
| ८ १९४१-४२ चीं अंदाजपत्रकें ... | ३०९ |
| ९ निवडक बाजारभाव | ३१० |



# अर्थ

बुधवार, ता. २५ जून, १९४१


## जर्मनीची रशियावर स्वारी

रूसो-जर्मन संबंधाचें अलीकडे पडलेलें कोडें उकलण्यास फारसा काळ लोटावा लागलेला नाहीं. ताज्या आलेल्या बातम्यांवरून जर्मनीचा मनसुबा उघडा झाला आहे. रशियन सरहद्दीवर जर्मनीच्या सुसज्ज फौजा आज कित्येक महिनेपर्यंत तयार ठेवण्यांत आल्या होत्या त्या आतां रशियन मुलखांत शिरल्या आहेत. जर्मनीनें रशियाशी केलेल्या मित्रत्वाचा करार अशा रीतीनें एकाएकी धाब्यावर बसवण्यास हिटलरला कारण तरी काय झालें ? रशियानें आपणांस कांहीं विशेष सवलती देऊन इंग्लंडशी चाललेल्या युद्धांत सहाय करावें असा तगादा हिटलरनें स्टॅलिनला लावला होता अशा बातम्या मध्यंतरीं प्रसिद्ध झाल्या होत्या. रशियन मुत्सद्दी ह्या मागण्यांचा स्वीकार करून जर्मनीच्या वजनाखालीं आपल्या राष्ट्रास दडपून घेण्यास तयार नसल्यानें हिटलरनें चिडून जाऊन स्वतःस एक नवीन शत्रु उत्पन्न केला आहे. तुर्कस्तानशीं नुकताच जर्मनीनें मित्रत्वाचा करार केला त्याचें रहस्य रशियावरील त्याच्या प्रस्तुत स्वारीनें स्पष्ट केलें आहे. पश्चिम युरोपांत, भूमध्य समुद्रांत व आफ्रिकेंत इंग्लंडशी निकराचा संग्राम चाललेला असतांना रशियाची मैत्री राखणें हा जर्मनीच्या दृष्टीनें शहाणपणाचा मार्ग झाला असता असें कोणासहि वाटणें सहाजिक आहे. चालू युद्धांत आपलें लढाऊ सामर्थ्य दुभंगूं न देण्यांत जर्मनीचें हित होतें आणि तें ओळखूनच त्यानें रशियाशी मैत्रीचा करार केला होता, अशी सामान्य समजूत होती. जर्मन नात्सी आणि रशियन बॉल्शेव्हिक ह्यांचें विळयाभोपळयासारखें सख्य होतें आणि जर्मनीस रशियाच्या समाजसत्तावादाचें विलक्षण वावडें होतें. असें असतां नात्सी व बॉल्शेव्हिक ह्यांचें सख्य कसें जमलें ? पश्चिमेकडे इंग्लंडविरुद्ध युद्ध चालू असतां पूर्व सरहद्दीकडे आपणांस भीति नसावी हाच त्या मैत्रीचा उद्देश होता. आतांच एकाएकी रशिया मित्राचा शत्रु कसा बनला ?

वरील प्रश्नाचें उत्तर हिटलर आणि त्याचे हस्तक ह्यांनीं जाहीर घोषणा करून देण्याचा प्रयत्न केला आहे. हिटलरच्या घोषणेंत रशियानें आजवर जर्मनीच्या हिताविरुद्ध केलेल्या कृत्यांचा पाढा वाचण्यांत आला आहे. त्याचा मुख्य आरोप असा आहे कीं जर्मनी आपल्या शत्रूशीं लढत असतां रशिया त्यास आंतून अप्रत्यक्ष रीतीनें सहाय देत असून चालू युद्धांचा अन्याय्य फायदा घेत आहे. पोलंडवर जर्मनीनें स्वारी केली तेव्हां त्या देशाचा पूर्व भाग रशियानें व्यापला. रुमानियापैकीं कांहीं मुलूख असाच त्यानें घेतला. उत्तरेच्या बाजूस इस्टोनिया, लाट्व्हिया, फिनलंड इत्यादि देश पादाक्रांत करतांना रशियाची अशीच वृत्ति होती. रशियाचे बोल्शेव्हिक पुढारी आपल्या आंतरराष्ट्रीय समाजसत्तावादाचें विष युरोपांत पसरीत आहेत असाहि हिटलरचा रशियाविरुद्ध आक्षेप आहे. युरोपची पुनर्घटना करण्याची हिटलरची योजना आहे तीमध्यें रशिया बसूं इच्छित नाहीं आणि जर्मनीचें आशियामध्यें आपली सत्ता पसरण्याचे प्रयत्न चालू आहेत त्यांस रशियन मुत्सद्यांचें पाठबळ मिळत नाहीं ह्या गोष्टींत प्रस्तुत आक्रमणाचा उगम आहे असें दिसतें. बाल्कनसमध्यें जर्मनीचें वर्चस्व स्थापन झालें तें रशियाच्या सुरक्षिततेस बाधक आहे ह्यांत संशय नाहीं. जर्मनीचें प्रस्थ तुर्कस्थान व सीरिया ह्यांच्या बाजूस वाढूं लागलें असतां तेंहि रशियास अपायकारक आहे ह्याची जाणीव रशियन मुत्सद्यांस झालेली हिटलरला अवगत आहे. आपल्या फौजेस तोंड देण्याचें रशियांत सामर्थ्य नाहीं ह्या कल्पनेनें त्या देशाविरुद्ध चढाईचें धोरण हिटलरनें प्रस्तुत स्वीकारलें आहे असें दिसतें.

रशियावर जर्मनीनें झडप घातली आहे तीमध्यें हिटलरनें आपल्या दोस्ताचा विश्वासघात केला आहे. आपल्या लढाऊ बेताच्या रशियास सुगावा लागूं न देतां हिटलरनें आपल्या फौजांस त्याच्या सरहद्दी ओलांडून जाण्यास हुकूम दिला, ह्या जर्मनीच्या कृत्यासंबंधानें भाषण करतांना मि. चर्चिल ह्यांनीं नात्सी अमानुष लुटारूपणाच्या ह्या नवीन उदाहरणाचें रहस्य स्पष्ट करून सांगितलें आणि त्या बाबतींतल्या इंग्लंडच्या धोरणाचा असंदिग्धपणानें आविष्कार केला. नॉर्वे, हॉलंड, बेल्जम इत्यादि देशांवर जर्मनीनें आक्रमण केलें तेव्हां एक वर्षामागें त्यांनीं रशियासहि धोक्याची सूचना देऊन जर्मनीच्या शब्दावर कोणीहि विश्वास ठेवू नये असें सर्वांस बजावलें होतें. हिटलरशाहीचा नाश करण्याचा इंग्लंड व अमेरिका ह्यांचा निश्चय कायम आहे एवढेंच नव्हे तर तो जर्मनीनें रशियावर हल्ला चढवण्यानें द्विगुणित झाला आहे असें त्यांनीं सांगितलें. हिटलरचा प्रत्येक शत्रु तो आपला मित्र आहे आणि त्याचा मित्र तो आपला शत्रू आहे असें म्हणून जर्मनीशी अधिक जोरानें व चिकाटीनें युद्ध चालवून त्याचा नायनाट करण्याचा इंग्लंडचा कृतसंकल्प त्यांनीं जाहीर केला.

पूर्व युरोपांत रशियाचा समाचार घेतल्यानंतर जर्मन फौजा पश्चिमेस इंग्लंडकडे वळवणें सोयीचें होईल ह्या कल्पनेनें हिटलरनें त्या राष्ट्राविरुद्ध युद्ध चालू केलें आहे. अमेरिकेची लढाऊ मदत मोठ्या प्रमाणांत इंग्लंडला पोहोचण्यास थोडा अवधि आहे, त्या काळांत रशियाचा काटा काढून टाकावयाचा असाहि त्याचा विचार आहे. ह्या गोष्टींची आपणांस जाणीव आहे असें म्हणून नात्सी जर्मनीस संधि मिळेल तेथें ठेचणें हें इंग्लंडचें ध्येय कायम राहील ह्या आशयाचे उद्गार मि. चर्चिल यांनीं काढले. रशियास शक्य ती मदत इंग्लंड देईल असें अभिवचनहि त्यांनीं दिलें. ह्या भाषणाचा उत्कृष्ट परिणाम अमेरिकेंत व इतरत्र झाला आहे. जर्मनीच्या रशियन स्वारीनें जपानला मात्र गोंधळांत टाकल्यासारखें झालें आहे. हिटलरची महत्वाकांक्षा वहावत मर्यादेच्या बाहेर जात चालली आहे हेंच त्याच्या नाशाचें मूळ आहे. रशिया बॉल्शेव्हिक आहे हें हिटलरला आजचें कळलें असें नाहीं. त्या राष्ट्राशी जर्मनीनें १९३९ मध्यें मित्रत्वाचा करार केला त्यास हिटलरनें हरताळ फासला आहे आणि त्या योगानें नात्सी लोकांचा प्रामाणिकपणा व दानत ह्यांवर झगझगित प्रकाश पडला आहे.

## हिंदी भुइमुगाचें पीक

हिंदुस्थानांतील शेतीच्या कित्येक पिकांस युद्ध-परिस्थितीमुळें बाहेरच्या देशांत मागणी राहिली नाहीं आणि त्यांच्या किंमती घटून शेतकरी वर्गाची स्थिति अडचणीची झाली आहे. हिंदी शेतकऱ्यास रोकडीचें उत्पन्न देणाऱ्या पिकांमध्यें भुइमुगास बरेंच महत्त्वाचें स्थान आहे. मद्रास प्रांतांत आणि मुंबईंतहि भुइमुगाची लागवड मोठ्या प्रमाणांत होते. त्या पिकास जरूर ती मागणी उत्पन्न करणें, त्याचे बाजारभाव वाढवणें किंवा त्याची लागवड मर्यादित करणें ह्या गोष्टी अखिल भारतीय महत्त्वाच्या असल्यानें हिंदुस्थान सरकारास त्यांकडे लक्ष द्यावें लागलें आहे. भुइमुगाच्या पिकाची वरील परिस्थिति लक्षांत घेऊन तिचा पद्धतशीर अभ्यास मद्रास प्रांतांतील अन्नमलय विश्वविद्यालयाचे अर्थशास्त्राचे प्राध्यापक, डॉ. नारायणस्वामी नायडू, ह्यांनीं करून आपले त्यावर आधारलेले विचार एका पुस्तकांत ग्रथित केले आहेत. (Goundnut: Annamalai University Economic Series No.7, General Editor, Prof. B.V. Narayanswami Naidu—Published by the University, Annamalainagar)

डॉ. नायडू ह्यांनीं मद्रास प्रांतांतील दक्षिण अर्कीट जिल्ह्यामधील भुइमुगाच्या पिकाची तपशीलवार माहिती गोळा करून ती ह्या पुस्तकांत प्रसिद्ध केली आहे. त्यांची चौकशी ह्याप्रमाणें मर्यादित असली तरी त्यांनीं सबंद हिंदुस्थानांतील पिकाच्या प्रश्नाचा विचार केला असून त्यांच्या सूचना सर्व प्रांतांस बोधप्रद होण्यासारख्या आहेत. ह्या दृष्टीनें आम्हीं ह्या लेखांत भुइमुगाबाबत सर्व साधारण माहिती आणि तिला अनुसरून अखिल भारतीय महत्त्वाच्या सूचना देण्याचें योजलें आहे.

भुइमुगाच्या पिकाचें क्षेत्र हिंदुस्थानांत सारखें वाढत आलें आहे. त्याबाबतींत मद्रासचा पहिला नंबर असून त्याच्या खालोखाल मुंबई प्रांत येतो. ह्या पिकास युद्धापूर्वी इतर देशांत चांगली मागणी होती, पण युद्ध चालू झाल्यावर ती कमी होऊन भुइमुगाच्या किंमती घसरल्या तेव्हां हिंदुस्थान सरकार त्या प्रश्नाचा विचार करूं लागलें. त्याचे आर्थिक सल्लागार डॉ. ग्रेगरी यांचा अभिप्राय असा पडला कीं त्या पिकाचें क्षेत्र मर्यादित केल्यावांचून त्याच्या किंमतीचा प्रश्न सुटणें शक्य नाहीं. पण हिंदी शेतकरी वर्गाची परिस्थिति अशी आहे कीं, ही सूचना अंमलांत येणें अत्यंत कठीण आहे. मध्यवर्ती सरकारनें दिल्ली येथें भरवलेल्या परिषदेंतहि बहुमत सक्तीनें भुइमुगाचें क्षेत्र मर्यादित करण्यास अनुकूल नव्हतें. किंमती खाली गेल्या कीं, शेतकरी लोक आपोआपच कमी भुइमूग पेरतील असें कित्येकांस वाटत होतें. हिंदी शेतकऱ्यांस व व्यापाऱ्यांस सहाय देण्याच्या हेतूनें ब्रिटिश सरकारनें ठराविक किंमतीस हिंदी भुइमूग खरेदी करावा अशी व्यवस्था हिंदुस्थान सरकारनें त्यांच्याशी केली. परंतु ह्या योजनेचा फायदा मध्यस्थांस झाला आणि नवीन पीक बाजारांत आलें तेव्हां भुइमुगाची किंमत शेतकऱ्यांच्या हातांत पडूं लागली ती दरखंडीस १२-१३ रुपयांच्यावर जाईना. तीस आणि वीस रुपयांच्या मानानें हा भाव शेतकऱ्यांस भयंकर तोट्याचा वाटला ह्यांत नवल नाहीं. ह्या स्थितींतून मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यांत आला. भुइमूग परदेशीं पाठवणाऱ्या व्यापाऱ्यांकडून पट्टी जमा करून ती शेतकऱ्यांमध्यें मदत म्हणून वाटण्याची सरकारची योजना ह्या पिकाचा पुरवठा मर्यादित होत नसल्यानें निरुपयोगी ठरणारी होती. तिचा फायदा फारच थोड्या शेतकऱ्यांस मिळाला असता आणि सोडवावयाचा मुख्य प्रश्न तसाच राहिला असता.

डॉ. नारायणस्वामी ह्यांच्या मतानें पिकाचें क्षेत्र मर्यादित करणें व भुइमुगाचें उत्पादन कमी करणें हे उपाय हिंदी शेतकऱ्याची सांपत्तिक स्थिति लक्षांत घेतां अग्राह्य आहेत. दोनच विधायक सूचना ह्या संबंधांत करतां येतील. भुइमुगाच्या ऐवजी दुसरें पीक लावणें व भुइमुगाचा खप देशांतल्या देशांत वाढेल अशी व्यवस्था करणें ह्या त्या होत. ह्यापैकीं पहिली, डॉ. नायडू म्हणतात, अव्यवहार्य आहे. भुइमुगाच्या पिकाला ज्या तऱ्हेची जमीन लागते, त्या तऱ्हेच्या जमिनींत दुसरीं उत्पन्न देणारीं पिकें चांगलीं निपजूं शकतील असें नाहीं. शिवाय दुसऱ्या पिकांची अवस्थाहि, किंमतीच्या दृष्टीनें भुइमुगासारखीच झालेली आहे. डॉ. नायडू ह्यांचें असें म्हणणें आहे कीं, भुइमुगास हिंदुस्थानांतच वाढती मागणी येईल अशी तजवीज करणें म्हणजे त्या पिकाचा कच्चा माल म्हणून दुसरें पदार्थ बनवण्याकडे उपयोग होईल असे धंदे काढणें हाच प्रस्तुत प्रकारणीं विधायक व इष्ट उपाय आहे. सध्याचा काळ असे धंदे काढण्यास अनुकूल असा आहे आणि ही संधि त्यांच्या मतानें वाया जाऊं देतां कामा नये. भुइमुगाच्या विक्रीच्या चालू पद्धतींत कित्येक सुधारणा आवश्यक आहेत. त्यांचें विवेचन डॉ. नायडू ह्यांनीं केलें आहे. भुइमुगाच्या पिकाची लागवड, त्याचा खर्च इत्यादि बाबींचें विवेचनहि त्यांनीं केलें आहे तें बोधप्रद आहे. त्यांनीं आपल्या चौकशीच्या योगानें उपस्थित केलेला प्रमुख प्रश्न हिंदुस्थानच्या आर्थिक योगक्षेमाच्या दृष्टीनें जिव्हाळ्याचा असून त्याच्याकडे सरकार व जनता ह्यांचें लक्ष जाणें अगत्याचें आहे.


अखिल महाराष्ट्रांत
गाजत असलेलें
नवयुग चित्र

**अमृत**

[ मराठी ]

दिग्दर्शक : विनायक

कथा-संवाद : खांडेकर

फोटोग्राफी : पां. नाईक

: भूमिका :

मीनाक्षी, ललिता पवार, बेबीदेवी, बाबूराव पेंढारकर, साळवी, बाबुअण्णा मालवणकर, मा. विठ्ठल आणि विनायक.

मिनर्व्हा, पुणें—

५ वा आठवडा

रोज ६॥ व १०

# स्फुट विचार

## तुर्कस्तान व जर्मनी ह्यांचा करार

भूमध्य समुद्राचा पूर्वभाग, सीरिया व आफ्रिका येथील युद्धक्षेत्रांत निकराच्या लढाया जर्मनी व व्हीशीचें मंत्रिमंडळ ह्यांच्याशीं इंग्लंडनें चालवल्या असतां तुर्कस्तान व जर्मनी ह्यांच्या दरम्यान मित्रत्वाचा करार झाल्याची बातमी प्रसिद्ध झाल्यानें जगांत सर्वत्र कुतूहल उत्पन्न झालें आहे. फॉन पॅपन ह्या आपल्या वकिलाचे मार्फत हिटलर तुर्कस्तानास स्वतःच्या राजकारणाच्या जाळ्यांत अडकावण्याचा प्रयत्न बरेच दिवस करीत आहे. इंग्लंड व तुर्कस्तान ह्यांचे स्नेहाचे संबंध बिघडवून स्वतःच्या कक्षेत तुर्कस्तानास ओढून घेण्याचा त्याचा बेत तुर्की राज्यकर्त्यांनीं मोठ्या सावधगिरीनें यशस्वी होऊं दिला नाहीं. जर्मनीनें ग्रीस, क्रीट व भूमध्यसमुद्राच्या पूर्व-भागांतील कित्येक बेटें पादाक्रांत केल्यामुळें हिटलरला तुर्कस्तानच्या मागें मित्रत्वाच्या कराराचा लकडा लावण्यास चांगली संधि मिळाली. इंग्लंडच्या विरुद्ध चाललेल्या युद्धांत आपणास तुर्कस्तानचें सहाय मिळावें ही हिटलरची इच्छा पुरी करण्यास तुर्की राज्यकर्ते तयार नव्हते आणि आजहि नाहींत. आपली तटस्थपणाची वृत्ति कायम ठेवण्याचा त्यांचा निर्धार अबाधित आहे. त्याचप्रमाणें इंग्लंडशीं मागेंच झालेल्या करारास बाध येणार नाहीं असें धोरण तुर्कस्ताननें अंगिकारणें हें त्या राष्ट्राच्या हिताचें आहे. प्रस्तुत प्रकरणांत तुर्कस्तानची भौगोलिक स्थिति लक्षांत घेणें आवश्यक आहे. एका बाजूनें जर्मनी व त्यानें पादाक्रांत केलेले देश तुर्कस्तानच्या सरहद्दीस येऊन भिडले आहेत. दुसऱ्या बाजूनें रशियाचें युद्ध-धोरण काय राहील हें अनिश्चित आहे आणि तिसऱ्या बाजूनें सीरिया व इराक हे देश रणक्षेत्रें बनले आहेत. ह्या तिरंगी घटनेंत तुर्की राज्यकर्त्यांवर आपल्या राष्ट्राच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याची अवघड जबाबदारी येऊन पडली आहे. जर्मनीशीं त्यांनीं नुकत्याच केलेल्या कराराकडे ह्या दृष्टीनें पहावें लागेल.

---

## करारांचें रहस्य

जर्मनी व तुर्कस्तान ह्यांचे दरम्यान करार झाला आहे त्यांत तीन कलमें आहेत. परस्परांच्या देशांचें क्षेत्र अबाधित रहाण्याच्या विरुद्ध कोणतीहि कृति प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें आपण करणार नाहीं असें बंधन दोन्ही राष्ट्रांच्या प्रतिनिधींनीं स्वतःवर घातलें आहे. दोन राष्ट्रांत मतभेद उत्पन्न झाल्यास त्यांचा निकाल मित्रत्वाच्या भावनेनें व तडजोडीनें केला जाईल अशी दुसरी अट करारांत आहे. करार बर्लिनमध्यें कायम व्हावा आणि त्याची मुदत निदान दहा वर्षांची असावी ह्या आशयाची तिसरी अट आहे. जर्मनी व तुर्कस्तान ह्यांचे आर्थिक संबंध अधिक दृढ व फलदायक होण्यासंबंधानें वाटाघाटी चालू व्हाव्या असें वरील करारावरोबरच ठरलें आहे. तुर्कस्तानच्या आर्थिक प्रगतीस लागणारें भांडवल व इतर सामुग्री त्या राष्ट्रापाशी नसल्यामुळें त्यास आजवर फ्रान्स व इंग्लंड ह्या देशांवर अवलंबून रहावें लागलें आहे. फ्रान्सकडून आतां ह्या बाबतींत सहाय मिळणें अशक्य आहे. जर्मनीनें अंकित केलेल्या देशांच्या सरहद्दी तुर्कस्तानास आतां येऊन मिळाल्या असल्या कारणानें त्यांची परस्पर देवघेव सोयीची झाली आहे ही सबब हिटलरला आर्थिक कराराच्या समर्थनार्थ पुढें करणें सोयीचें झालें आहे. तुर्की परराष्ट्रीय मंत्री, एम्. सरायोग्लू ह्यांनीं जर्मनीशीं झालेल्या करारावर भाष्य केलें, त्यांत ते म्हणतात कीं तो देश आणि तुर्कस्तान ह्यांच परस्पर संबंध शेकडो वर्षें स्नेहाचे असे राहिलेले असून त्या स्नेहभावाची वृद्धि प्रस्तुतच्या करारानें झाली आहे एवढेंच त्याचें रहस्य आहे. करारासंबंधानें त्यांनीं समाधान व्यक्त केलें आणि जर्मन वकील फॉन पॅपेन ह्यांच्या त्या संबंधांतल्या कामगिरीचा उल्लेख केला. इंग्लंडशीं तुर्कस्ताननें मागें करार केले आहेत त्यांस नव्या जर्मन करारानें बाध येऊं नये ह्याविषयीं तुर्की सरकारनें दक्षता बाळगली आहे. तुर्कस्तानला आपल्या त्रिकुटांत ओढण्याचा जर्मनीचा प्रयत्न यशस्वी झालेला नाहीं आणि कराराच्या बाबतींत फॉन पॅपेन ह्यांच्याशीं चाललेल्या बोलण्यांची माहिती तुर्की मुत्सद्यांनीं इंग्लंडला वेळोवेळ दिलेली आहे ह्या कारणानें नवीन करारांचें ब्रिटिश सरकार व जनता ह्यांस आश्चर्य वाटत नाहीं. परराष्ट्रीय राजकारणांत मिळवलेला हा मोठा विजय आहे अशा आशयाचा प्रचार जर्मनी करील; पण त्याची पूर्वपीठिका व पार्श्वभूमि लक्षांत आणली असतां ह्या वल्गना व्यर्थ आहेत अशी कोणाचीहि खात्री पटेल. व्यापारी करारांच्या साधनानें जर्मनीनें आजपर्यंत बाल्कन राष्ट्रांस आपले आर्थिक गुलाम बनवलें आहे. ह्या कटु अनुभवानें तुर्की मुत्सद्यांनीं सावध होणें मात्र अगत्याचें आहे. तसेंच ग्रेट ब्रिटनच्या विरुद्ध स्वतःच्या देशाचा उपयोग त्यांनीं जर्मनीस करूं देतां कामा नये. ह्या संबंधांत जागरूक रहाण्याची आवश्यकता पूर्वीपेक्षां आतां किती तरी पटींनीं अधिक तीव्र झाली आहे ह्याची जाणीव त्यांनीं ठेवली पाहिजे.

---

## हिंदी मालकीच्या आगबोट वहातुकीचें महत्त्व

हिंदुस्थानच्या किनाऱ्याची लांबी ४½ हजार मैल आहे. तांदूळ, कोळसा, लाकूड, मीठ, तेलें, इत्यादि मिळून सुमारें ७० लक्ष टन मालाची वहातुक दरसाल ह्या किनाऱ्यानें होते. पश्चिम किनाऱ्यावर सुमारें १५ लक्ष उतारूंची व हिंदुस्थान आणि ब्रह्मदेश ह्यांचे दरम्यान ५ लक्ष उतारूंची वहातुक आगबोटींतून होते. परदेशांशीं होणारा व्यापार व चालणारी वहातुक लक्षांत घेतली, तर वरील आकड्यांत २५० लक्ष टन मालाची व २ लक्ष उतारूंची वाढ होईल. एवढा प्रचंड व्यापार व वहातुक हीं हिंदी मालकीच्या आगबोटींतून होणें अत्यंत इष्ट आहे. राष्ट्राच्या स्वतःच्या आगबोटी असल्याखेरीज, त्याचें सध्यासारख्या बिकट परिस्थितींत निभणें शक्य नाहीं, हें आतां स्पष्ट झालें आहे. ही वहातुक करणाऱ्या कंपन्या हिंदी मालकीच्या व हिंदी व्यवस्थेखालीं असल्या, तरच व्यापार, उद्योगधंदे, ह्यांची वाढ होण्यास सहाय मिळून हिंदी संपत्ति स्वदेशांत रहाण्यास आणि हिंदी लोकांस चरितार्थाचें एक महत्त्वाचें साधन प्राप्त होण्यास संधि मिळेल, हें उघड आहे. ग्रेट ब्रिटन जवळील आगबोटी १ कोटि ७९ टनांच्या आहेत, परंतु हिंदी आगबोटी फक्त १ लक्ष, ३२ हजार टन आहेत. हिंदी किनाऱ्यावरील आगबोटींच्या वहातुकींत ब्रिटिश कंपन्यांचा वाटा ७९ % आहे. ग्रेट ब्रिटनचा एकूण व्यापार हिंदी व्यापाराच्या फक्त ५½ पट आहे. परंतु ग्रेट ब्रिटन जवळील आगबोटींची माल वहाण्याची शक्ति १३५ पट आहे. ग्रेट ब्रिटन आपल्या स्वतःच्या आगबोटी वाढवून व्यापारी वहातुक स्वतःकडे राखण्याची शिकस्त करीत आहे, परंतु हिंदुस्थानांत खासगी प्रयत्नांसहि मिळावें तसें प्रोत्साहन मिळत नाहीं, अशी फार जुनी तक्रार आहे.

---

### विजगापट्टम येथें आगबोटी बांधण्यास प्रारंभ

हिंदी आगबोट वहातुकीच्या वाढीचे प्रीत्यर्थ शिंदा स्टीम नॅव्हिगेशन कंपनी व श्री. वालचंद हिराचंद ह्यांनीं चालविलेले प्रयत्न प्रशंसनीय आहेत व त्यांचें दृश्य फल म्हणजे हिंदी आगबोटी बांधण्यासाठीं विजगापट्टम येथें तयार होत असलेल्या शिपयार्डचा मुहूर्त गेल्या आठवड्यांत करण्यांत आला, हें होय. बाबू राजेंद्रप्रसाद ह्यांचे अध्यक्षतेखालीं पायाचा दगड बसविण्याचा समारंभ ता. २१ रोजीं मोठ्या थाटानें पार पडला. शिंदा स्टीम नॅव्हिगेशन कंपनीतर्फे प्रास्तविक भाषण करतांना श्री. वालचंद ह्यांनीं प्रस्तुत उपक्रमास आजची स्थिति प्राप्त होण्याचे मार्गांत किती अडचणी आल्या, हें सांगितलें. लवकरच, विजगापट्टम येथील शिपयार्डमध्यें दरसाल १६ आगबोटी तयार होऊं लागतील व त्यासाठीं १० हजार कामगारांची नेमणूक केली जाईल. युद्ध प्रयत्नांत आगबोटी बांधण्याचे धंद्याची गणना करण्यास हिंदुस्थान सरकारनें नकार दिला, युद्धामुळें विलायतेंतून मागविलेले तज्ज्ञ व यंत्रसामुग्री हीं येऊं शकलीं नाहींत, इत्यादि अडचणींतून मार्ग काढून शिंदा कंपनीनें आपलें काम चालू ठेवलें आहे. शिपयार्डसाठीं आयात होणाऱ्या कांहीं मालास वहातुकींत प्राधान्य मिळत असलें तरी तें टिकेलच असें नाहीं. अशा तऱ्हेच्या असंख्य अडचणींतून व निराशाजनक परिस्थितींतून हा धंदा स्थापन करण्याचा शिंदा कंपनीचा व शेठ वालचंद ह्यांचा निर्धार कौतुकास्पद आहे. उपक्रमाचें महत्त्व अतिशय मोठें आहे व त्याच्या यशाकडे सर्वांचे डोळे लागून रहातील, ह्यांत नवल नाहीं.

---

### दि इंडियन प्रोग्रेसिव्ह इन्शुअरन्स कं. लि.

वरील कंपनीचा ३१ डिसेंबर १९४० अखेरचा डायरेक्टरांचा रिपोर्ट व ताळेबंद आणि ३१ डिसेंबर १९४० अखेरच्या त्रैवार्षिक मूल्यमापनाचा ॲक्चुअरीचा रिपोर्ट आमच्याकडे आला आहे. १९४० मध्यें कंपनीनें १८,८४५ रुपये वार्षिक हप्त्यांच्या ३,६७,७७५ रुपयांच्या पॉलिसी दिल्या म्हणजे, १९३९ चे मानानें कंपनीच्या कामांत ५२ हजार रुपयांची वाढ झाली. लॅप्सचें प्रमाण २०% पेक्षा कमी आहे. अहवालाचे वर्षी कंपनीला एकूण ६०,०५८ रुपये उत्पन्न झालें. त्यांतून सर्व खर्च भागून लाइफ फंडांत २१,२६९ रुपयांची भर पडून तो फंड ६३,३४१ रुपये झाला. व्यवस्थेच्या खर्चाचें हप्त्यांच्या उत्पन्नाशीं प्रमाण ५१·८७% पडलें, म्हणजे तें २·१६% नीं कमी झालें. कंपनीच्या देण्याचे बाजूस ५६,१९५ रुपये भांडवल, ५,७६३ रुपये इनव्हेस्टमेंट फलक्चुएशन फंड, २५० रुपये कॉन्टिन्जन्सी रिझर्व्ह फंड, २,८४५ रिझर्व्ह फॉर कमिशन, ६३,३४१ रुपये लाईफ फंड, ३५,५८७ रुपये विमेदारांच्या मुदती ठेवी, इत्यादि बाबी आहेत. जिंदगीचे बाजूस २२,७७६ रुपयांचीं कर्जे, १,०८,२३८ रुपयांचे रोखे, डिबेंचर्स इ., ९,९६१ रुपये रोख व बँकांत, ३,१२५ रुपये फर्निचर व डेडस्टॉक, ४,७७१ रुपये प्राथमिक खर्च, ८,३०० रुपये ऑर्गनायझेशन खर्च, वगैरे बाबी आहेत. कंपनीचें ३१ डिसेंबर १९३९ अखेरचें मूल्यमापन श्री. ग. स. मराठे, ॲक्चुअरी, ह्यांनीं केलेलें आहे. सदर मूल्यमापन ४% व्याजाच्या दरानें केलें असून पुढील खर्चाकरितां व बोनसकरितां शेंकडा १५ इतक्या रकमेची तरतूद त्यांत केलेली आहे व मूल्यमापनांत ८२० रुपयांचा वाढावा निघालेला आहे. जरी कंपनी डिव्हिडंड अगर बोनस देऊं शकली नाहीं तरी मूल्यमापनावरून निदर्शनास येणारी परिस्थिति समाधानकारकच वाटेल ह्यांत संशय नाहीं. मूल्यमापनाचें आधारभूत खर्चाचें प्रमाण कांहीं वर्षांत १५% येण्यास हरकत नाहीं व कांहीं वर्षांचे अवधींत कंपनीस ४३% व्याजहि सुटेल असा ॲक्चुअरींचा विश्वास आहे. कंपनीच्या चालकांच्या परिश्रमानें, ॲक्चुअरीनें अपेक्षा केल्याप्रमाणें, कंपनीची परिस्थिति आणखी सुधारून तिला लवकरच आघाडीचें स्थान मिळो, अशी इच्छा आहे. मूल्यमापनाच्यासंबंधीं कंपनीचे व्हाइस चेअरमन, श्री. एच.जी.घारपुरे (आय.सी.एस.रि.) ह्यांच्या सहीनें प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टींतील माहितीवरून सध्याच्या बिकट परिस्थितींतहि कंपनीनें गेल्या चार वर्षांत मिळविलेल्या यशाची व अपेक्षित प्रगतीची चांगली कल्पना येते. कंपनीचा व्यवहार काटकसरीनें चालविण्याचें चालकांचें धोरण योग्य असून कंपनीचे सेक्रेटरी श्री. गाडगीळ व श्री. कळंत्रे ह्यांचा उत्साह व खटपट प्रशंसनीय आहे.

---

### हैद्राबाद संस्थानांतील सहकारी चळवळ

गेल्या वर्षी ३३६ नवीन सोसायट्या नोंदण्यांत आल्या व १५ जुन्या सोसायट्या रद्द झाल्या. एकूण सोसायट्यांची संख्या ३,९५८ होऊन त्यांचे सभासद १ लक्ष, ५४३ हजार झाले. त्यापूर्वीच्या वर्षांचे तत्सम आकडे ३,६३८ सोसायट्या व १ लक्ष, ३८ हजार सभासद, असे होते. सहकारी चळवळींतील खेळतें भांडवल एका वर्षांत २ कोटि, ७२३ लाखांचें २ कोटि, ७७३ लाख रुपये झालें. भरणा झालेल्या भांडवलाचे व रिझर्व्ह फंडांचे आकडे अनुक्रमें ६३ लक्ष, ४५ हजार व ५७ लक्ष, ४२ हजार असे होते. डोमिनियन बँकेचें वसूल भांडवल ५ लक्ष, ६१ हजार रुपये व रिझर्व्ह ९ लक्ष, ३ हजार रुपये होते. बँकेनें सरकारी नोकरांना घरें बांधण्यासाठी ४ लक्ष, २५ हजार रुपये दिले. सेंट्रल बँकांच्या सभासदांची संख्या ४,६८५ ची ४,८४३ झाली व त्यांचें खेळतें भांडवल ६५ लक्ष, १० हजारांचें ६६ लक्ष, ९८ हजार रुपये झालें. सरकारनें वाईट परिस्थितींतील सेंट्रल बँकांना ५ वर्षे मुदतीनें ८ लक्ष रुपये बिनव्याजी व १० वर्षे मुदतीनें ३% दरानें ७ लक्ष रुपये कर्जाऊ दिले. 'धान्य' सोसायटींची संख्या ७५ ची ९० झाली. बिगर शेतकी सोसायट्यांची प्रगतीहि समाधानकारक होत आहे. कोऑपरेटिव्ह इन्शुअरन्स सोसायटीच्या सभासदांची संख्या १ हजाराची २१ हजार झाली व उतरलेल्या विम्यांची रकम १५ लक्ष, ७८ हजार झाली. सोसायटीस १ लक्ष ४७३ हजार रुपये उत्पन्न झालें. त्यापूर्वीच्या वर्षी तें ७८, ८५६ रुपये झालें होतें. सोसायटीस १०,३९५ रु. नफा झाला. सेंट्रल को. यूनियनचें शैक्षणिक कार्य चालूच होतें.

---


## GOKHALE INSTITUTE OF POLITICS AND ECONOMICS

**Servants of India Society's Home, Poona 4**

**ADMISSIONS TO STUDENTS**

reading for the M. A. Examination by papers or by thesis in Economics. Two scholarships of Rs. 25 P. M. to be awarded to research students.

D. R. GADGIL,
Director.

## कापडाच्या गिरण्यांतलि रात्रपाळी

मुंबई प्रांतांतील कपास कापडाच्या गिरण्यांत मागें रात्रपाळी मधून मधून चालत असे, परंतु गेल्या चार-पांच वर्षांत रात्रपाळी ही एक नित्याची बाब होऊन बसली आहे. १९१८ सालीं सर नेस वाडिया ह्यांच्या गिरणींत रात्रपाळी प्रथम सुरू झाली. अहमदाबादेंत १९२४ सालीं रात्रपाळीस प्रारंभ झाला. सोलापूर येथें १९३८ चे पूर्वी रात्रपाळी. अपवादात्मकच होती. खालील तक्त्यांत रात्रपाळी चालविणाऱ्या गिरण्यांत वाढ कशी होत गेली, हें दाखविलें आहे:--

| | मुंबई | | अहमदाबाद | |
|---|---|---|---|---|
| | गिरण्या | कामगार | गिरण्या | कामगार |
| १९३० | १६ | ३,५९२ | १८ | ६,९५४ |
| १९३२ | १० | १०,१०७ | १८ | ६,२९३ |
| १९३५ | ३४ | २७,६८० | ३३ | १२,०३० |
| १९३८ | ५२ | ३३,०५९ | ५६ | ३४,६१८ |
| १९३९ | ४० | ३२,४११ | ४३ | २४,९५४ |

सबंध मुंबई प्रांतांत मिळून १९३५ साली २ लक्ष, ३६ हजार कामगार दिवस पाळीवर व ५३ हजार कामगार रात्रपाळीवर होते. १९३८ चे तत्सम आकडे २ लक्ष, ३९ हजार व ९८ हजार असे आहेत. जेथें काम अखंड चाललें पाहिजे, अशा ठिकाणीं रात्रपाळी आवश्यक आहे.स्थायी खर्चांत बचत करून,जादा भांडवली खर्च करावा न लागतां उत्पादनांत वाढ करण्याची शक्ति रात्रपाळींत आहे. मागणीमध्यें होणाऱ्या तात्कालिक वाढीस रात्रपाळी हा सोइस्कर उपाय आहे. यंत्रसामुग्रींत झपाट्यानें वाढ होत आहे, ह्या दृष्टीनें त्यांतून अधिकांत अधिक उत्पादन शक्य तितक्या लवकर काढून घेतल्यानें खर्चांत व व्याजांत मोठी बचत होऊं शकते.

कित्येक गिरण्यांच्या मॅनेजिंग एजंटांचें वेतन उत्पादनाच्या परिमाणावर अवलंबून असतें व उत्पादन वाढावें ह्यासाठी रात्रपाळीचा अवलंब केला जाणें अस्वाभाविक नाहीं. रात्रपाळीमुळें उत्पादनखर्च कमी पडून मालाचा खप वाढवितां येतो असेंहि सांगण्यांत येतें. तथापि, रात्रपाळींत काम दिवसाइतकें चांगलें होतें किंवा नाहीं हा महत्त्वाचा प्रश्न आहे. दूरतार्शी उत्पादनांतहि कांहीं फरक पडतो कीं काय, हेंहि पाहिलें पाहिजे. मध्यरात्रीपर्यंत काम चांगलें होतें, परंतु त्यानंतर तें खराब होऊं लागतें, असा अनुभव आहे. रात्रपाळीचे वेळीं काम चांगलें व भरपूर मिळण्यास गिरणींत चांगला उजेड व खेळती हवा असणें अगत्याचें आहे. कांहीं गिरण्यांत उजेड कमी असतो, तर कांहींत तो फार चकचकीत असतो. जेवणासाठी चांगल्या व पुरेशा जागेची जरूरी रात्रपाळीचे वेळीं विशेष भासते. रात्रपाळीचा कामगारांचे प्रकृतीवर अनिष्ट परिमाण होण्याचें प्रमाण किती आहे, हें सांगतां आलें नाहीं, तरी रात्रपाळी करणारांमध्यें आजारीपणा, डोळ्याचे विकार, पोटाचीं दुखणीं, इत्यादि ज्यास्त आढळतात.रात्रपाळीमुळें जेवणाच्या वेळांत अनिष्ट फरक पडतो, त्याचा दुष्परिणाम कामगारांचे प्रकृतीवर होतो. कामगारांना रात्रीं काम केल्यानंतर दिवसा अखंड गाढ झोप व विश्रांति मिळणें आवश्यक आहे, परंतु त्यांच्या खोल्यांतून ती त्यांच्या नशिबीं येणें अशक्यप्राय आहे, "मनुष्याच्या स्वाभाविक संवयींत फेरफार केल्यास त्याच्या शारीरिक क्रियांवर त्याचा परिणाम होणे स्वाभाविक आहे. रात्रपाळीमुळें मनुष्याची झोप पुरी होत नाहीं. दिवसाचा प्रखर प्रकाश, वेगवेगळे आवाज, इकडेतिकडे जाण्याचा मोह, घरगुती कामें, मुलें संभाळणें, जेवणें, कपडे धुणें, ह्या सर्व गोष्टी झोपेच्या आड येतात." रात्रपाळीमुळें घरची सर्व घडी बिघडते, मुलांची आबाळ होते, आरोग्यसंवर्धक गोष्टी करतां येत नाहींत, शैक्षणिक प्रगति खुंटते, इत्यादि मुद्देहि महत्त्वाचे आहेत.

रात्रपाळी हानिकारक आहे, हें कामगारास समजतें. परंतु बेकारीच्या निवारणाची दुसरी कोणतीहि दुसरी सोय नसल्याकारणानें त्याचा इलाज चालत नाहीं. तात्पुरत्या वाढत्या मागणीच्या पुरवठ्यासाठी केव्हां केव्हां रात्रपाळी आवश्यकहि असते. रात्रीच्या कामासाठी जास्त मजुरी देणाऱ्या गिरण्यांची संख्या एक—दोन पेक्षां अधिक नाहीं: बहुतेक देशांत रात्रपाळीस जास्त मजुरी देण्याची पद्धति नाहीं, रात्रपाळीचें योग्य नियंत्रण करून कामगारांच्या हिताचें रक्षण होईल अशी तजवीज केली तर हिंदुस्थानांतहि रात्रपाळीस जास्त मजुरी देण्याची आवश्यकता नाहीं, असा टेक्स्टाइल लेबर इन्कायरी कमिटीचा अभिप्राय आहे. रात्रपाळी दिवसपाळीपेक्षा कमी तासांची असावी काय असा एक महत्वाचा प्रश्न आहे. जेथें तीन पाळया चालू नाहींत अशा ठिकाणीं रात्रीं १२ ते सकाळीं ७ गिरणी अजीबात बंद ठेवावी व दोन्हीं पाळयांचे कामाचें तास ८½ तास ठेवावेत म्हणजे गिरणीमालक व कामगार ह्या दोघांचेंहि हित साधेल, असें कमिटीचें म्हणणें आहे. रात्रपाळी किती काळ अखंड चालावी, हाहि महत्त्वाचा प्रश्न आहे. तो काळ एक महिन्याचा असावा व रात्रपाळीसाठी गिरण्यास लायसेन्स घेण्यास लावावें म्हणजे त्यावर योग्य नियंत्रण होईल, अशीहि कमिटीची सूचना आहे. रात्रपाळीचें नियंत्रण हिंदुस्थानांत एकाच तत्त्वावर केलें जाणें अगत्याचें आहे, परंतु त्यासाठी मुंबई प्रांतानें वाट न पहातां, पुढाकार घेणें इष्ट आहे.

सिंगल व डबल पाळी ही मुंबई प्रांतांतील गिरण्यांत आढळते. कांहीं गिरण्यांत तीन पाळया असतात. अहमदाबादमधील कांहीं गिरण्यांत रिले पद्धत चालू आहे, तीमध्यें विश्रांतीचे वेळींहि काम चालू असतें. कामगारांचे दोन अगर अधिक गट करून त्यांच्या विश्रांतीच्या वेळा वेगवेगळया ठरवून हें साधतां येतें. एका गटाच्या विश्रांतीचे वेळांत दुसऱ्या गटाचें काम चालू असतें.

दोन पाळयांच्या वेळा खालीलप्रमाणे असूं शकतील:—

पहिली पाळी—

सकाळीं ६ ते सकाळीं ११<br>दुपारीं ३ ते रात्रीं ७ } ९ तास

दुसरी पाळी—

सकाळीं ११ ते दुपारीं ३<br>रात्रीं ७ ते रात्रीं १२ } ९ तास

ह्यापेक्षांहि दुसरी पद्धत असूं शकेल:—

| गट | सुरवातीची वेळ | काम संपण्याची वेळ, | विश्रांतीची वेळ |
|---|---|---|---|
| अ | सकाळीं ६-३०, | रात्रीं ७-३०, | सकाळीं ९-३० ते दुपारीं १-३० |
| ब | " | " | दुपारीं १२-३० ते ४-३० |
| क | " | दुपारीं ४-३० | दुपारीं १२-३० ते १-३० |
| ड | सकाळीं ९-३० | रात्रीं ७-३० | दुपारीं १२-३० ते १-३० |

## विचारप्रवर्तक सहकारी बातम्या

(ले.: —वा. चिं. भानु)

**जमिनींचें संयोगीकरण;**—हिंदी शेतकऱ्याची आर्थिक स्थिति सुधारण्याच्या कामीं ज्या अनेक अडचणी दत्त म्हणून पुढें उभ्या राहतात त्यांत, जमिनींची होणारी चिरफाड ही एक फार मोठी अडचण आहे, असे उद्गार श्री. कृष्णसिंह, बिहार प्रांताचे कॉंग्रेसपक्षीय माजी दिवाण, यांनीं एका सहकारी परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून काढले. त्याचा विचार सहकारी कार्यकर्त्यांनीं व हिंदुस्थान सरकारनेंहि विशेष आस्थेवाईकपणानें करावयास हवा आहे. आज अनेक पिढ्यान्‌पिढ्या वारसा हक्कानें बापापासून मुलाला वडिलार्जित जमिनी मालकीनें येत असतां हिस्सेदारीनें जमिनींची चिरफाड कशी बेसुमार होत आली आहे हें आतां नव्यानें कोणास सांगण्याचें कारण नाहीं. अशा तुकड्यांची खरेदी-विक्रीहि फायदेशीरपणानें होत असल्यानें एकाच गांवांत एका शेतकऱ्याला पांच-पंचवीस जमिनींचे तुकडे असतात; पण तें सलग नसल्यानें त्यांची मेहनत, मशागत करणें, त्यांत पिकें काढणें, ती राखणें, त्यांतील माल विक्रीसाठी एकत्र करणें या मामुली कामासाठी त्याला करावा लागणारा खर्च उत्पन्नाच्या मानानें जबर पडतो व शेतीचा धंदा किफायतशीर होत नाहीं, असा प्रत्यही अनुभव येत आहे. तेव्हां शेतकऱ्याची उन्नति घडवून आणण्यास जे अनेक दिशांनीं प्रयत्न करावयाचे त्यांत त्याच्या जमिनी सलग होतील, त्याच्या विखुरलेल्या तुकड्यांचें संयोगीकरण होईल इकडे प्रथम लक्ष देणें हें शेतकऱ्यांच्या कैवाऱ्यांचें आद्य कर्तव्य आहे.

सुमारें १३–१४ वर्षांपूर्वी मुंबई प्रांताचे एक नामवंत फडणीस सर चुनीलाल मेथा, यांनीं असा एक प्रयत्न केला होता. असलेल्या तुकड्यांचें एकत्रीकरण करणें व नवीन तुकडे बेसुमार न पडतील अशी कायद्यानें तरतूद करणें हा सर चुनीलाल यांचा हेतु होता. कांहीं मंडळींनी हा केवळ सरकारी प्रयत्न म्हणूनच ह्याणून पाहण्याच्या एकाच दृष्टीनें जनतेची दिशाभूल केली, नामदार मेथांच्या हेतूंचा विपर्यास केला व त्यामुळें हिंदी शेतकऱ्यांची स्थिति सुधारण्याचें काम लांबणीवर पडलें. तथापि कार्यकर्त्यांनीं निराशा न होतां सहकारी पद्धतीनें पुन: तो प्रयत्न हातीं घेतलाच पाहिजे. शेतजमिनी तुकड्यांचें सयोगीकरण केल्यास परिणामीं तें शेतकऱ्याला कसें फायदेशीर होतें हें पंजाब प्रांतानें केलेल्या कामगिरीवरून आतां स्पष्ट झालें आहे. जवळ जवळ ९ लाख एकर जमिनीचें संयोगीकरण, संबंध असलेल्या शेतकऱ्याचे संमतीनें करण्यांत पंजाब प्रांतानें पुढाकार घेतलेला आहे आणि त्यामुळें आतां अवश्य त्या ठिकाणीं सक्तीचें तत्वही लागू करण्यास पंजाब प्रांताचें रेव्हेन्यु खातें तयार झालें आहे. आरंभीच्या काळांत यासाठीं होणारा खर्च पंजाब सरकारनें सोसला आहे. पण आतां एकाच मालकाच्या विखुरलेल्या जमिनींचे तुकडे एकत्र करण्यापासून होणारे फायदे त्या शेतकऱ्यांना उघड उघड दिसूं लागल्या कारणानें असें संयोगीकरण करण्यासाठी दर एकरीं ८ ते १० आणे पर्यंत खर्चेही आपखुषीनें अंगावर घेण्यास ते तयार होत आहेत.

अशी सहानुभूतीची अनुकूल परिस्थिति निर्माण झाली असल्यानें कायद्याच्या दंडुक्याचा वचक दाखविण्याचा प्रसंग पंजाब प्रांताच्या रेव्हेन्यू खात्यावर येत नाहीं, पण जर कोणी हटवादीपणा करूं लागला तर त्याला आतां सक्तीनें संयोगीकरण करण्यास भाग पाडण्यासाठी पंजाब सरकारनें कायद्याचेंहि पाठबळ घेतलेलें आहे. पण पुष्कळसें काम शेतकऱ्यांना फायदे कसे होतात तें स्पष्ट करून, उदाहरणें दाखवून, त्यांचें मन वळवून खेळीमेळीनेंच करण्यांत येत असल्यानें प्रत्यक्ष कायद्याचा बागुलबोवा दाखविण्याचा प्रसंग क्वचित येतो. पंजाब प्रांतानें ज्या प्रमाणें हें महत्वाचें कार्य अंगिकारलें तसेंच त्याचें अनुकरण इतर प्रांतांच्या सरकारांनींहि केलें पाहिजे व सहकारिता ही शाब्दिक चळवळ नसून ती प्रत्यक्ष कृतीची चळवळ आहे हें दाखविण्याची संधि वाया न घालविली पाहिजे.

संयोगीकरण केलेल्या जमिनींमधून शेकडा १० ते २५ टक्के पर्यंत निवळ उत्पन्नांत भर पडते असा पंजाब प्रांतांत अनुभव येत आहे.

* * * *

हातमागाच्या धंद्याची सखोल चौकशी करून 'सत्याचे शोध' करण्यासाठीं हिंदुस्थान सरकारनें नुकतीच कमेटी नेमली आहे. मद्रास युनिव्हर्सिटीचे आर्थिक विभागाचे प्रो. जे. थॉमस यांच्या अध्यक्षत्वाखालीं ही कमेटी काम करीत असून अलाहाबाद युनिव्हर्सिटीचे प्रो. बी. पी. आडरकर हे कमेटीचे सेक्रेटरी नेमण्यांत आलेले आहेत.

* * *

मद्रास इलाख्यांतील नॉर्थ अर्काट जिल्ह्यांत शेतीच्या कामकाजासाठी विजेच्या साह्यानें चालणारे पंपाचा पुरवठा करणारी एक सहकारी तत्वावर संस्था उभारण्यांत आलेली आहे. या दिशेनें हा अगदीं पहिलाच प्रयत्न आहे. सरकारच्या मदतीवर असे कांहीं प्रयत्न यशस्वी झाल्याचें आढळून आल्यानेंच सहकारी तत्त्वावर हा प्रयत्न करण्यांत आला आहे.

* * *

खेडेगांवची सुधारणा करून दाखवितील अशा गांवाना उत्तेजन मिळावें म्हणून मुंबई सरकारनें रु. १०० चें एक बक्षीस ठेवलें असून तें दरसाल प्रत्येक जिल्ह्यांतील खेडेगांवाला मिळावयाचें आहे.

---

## १९३९–४० हें वर्ष शेतीस कसें गेलें?

### मुंबई प्रांतांतील परिस्थिति

गेलें वर्ष मुंबई प्रांतांतील शेतीस साधारणपणें बरें गेलें, परंतु १९३८–३९ चे मानानें तें वाईटच गेलें असें म्हटलें पाहिजे. पावसांत वरचेवर पडलेले मोठाले खंड व मान्सून पावसाचें लवकर बंद होणें, ह्यामुळें पिकांची वाढ खुंटली. ऑगस्टअखेर व सप्टेंबरचे प्रारंभीं सर्व प्रांतभर पाऊस पडला. त्यानें परिस्थिति सावरली व रब्बी पिकांची लागवडहि शक्य केली. तथापि, अखेरच्या पावसांनीं दगा दिलाच. गुजराथ व महाराष्ट्र येथील ज्वारीची लागवड वाढली, परंतु कर्नाटकांतील बाजरीची लागवड २ लक्ष, २३ हजार एकरांनीं कमी होऊन ६२ हजार ज्यास्त एकरांत ज्वारी लावण्यांत आली. तांदळाच्या लागवडींत व गव्हाच्या लागवडींत अनुक्रमें १ लक्ष, ५५ हजार एकरांची व १ लक्ष, ७५ हजार एकरांची घट झाली. कपास, तंबाखू, गळिताचीं धान्यें, ह्यांची लागवड ४७ हजार एकरांनीं कमी झाली. १९३८–३९ मध्यें, कालव्याखालीं ११ लक्ष, ४७ हजार एकर जमीन होती, ती १९३९–४० मध्यें १२ लक्ष, १५ हजार झाली.

## १९४१–४२ चीं अंदाजपत्रकें

( आकडे लक्ष रुपयांचे आहेत )

| सरकार | उत्पन्न | खर्च | वाढावा | तूट |
|---|---|---|---|---|
| मध्यवर्ती सरकार | १,४५,०४·८३ | १,५८,८९·३८ | ... | १३,८४·५५ |
| प्रांत | | | | |
| मद्रास | १८,२१·३७ | १८,०८·६२ | १२·७५ | ... |
| संयुक्त प्रांत | १४,३४·३० | १४,२९·४६ | ४·८४ | ... |
| बंगाल | १४,०३·१४ | १५,३७·३८ | ... | १,३४·२४ |
| मुंबई | १३,५६·६५ | १३,५६·०० | ·६५ | ... |
| पंजाब | १३,२८·६७ | १२,५६·३५ | ७२·३२ | ... |
| बिहार | ६,११·०८ | ५,७९·८२ | ३१·२६ | ... |
| मध्यप्रांत व वऱ्हाड | ५,१०·७६ | ५,०८·७८ | १·९८ | ... |
| सिंध | ४,३५·४७ | ४,३४·४७ | १·०० | ... |
| आसाम | ३,१३·०१ | ३,२४·९० | ... | ११·८९ |
| ओरिसा | १,९२·७४ | १,९०·५९ | २·१५ | ... |
| सरहद्द प्रांत | १,९१·२५ | १,९०·९३ | ·३२ | ... |

## ग्रामोद्धारखात्यानें काय केलें ?

ग्रामसुधारणेकडे खास लक्ष पुरवून, ग्रामीण प्रगति घडवून आणण्यासाठी एक जबाबदार खातें म्हणून १९३९ सालच्या एप्रीलपासून हें खातें मुंबई इलाख्यांत उघडण्यांत आलें होतें व अवघ्या दीड वर्षातच त्याच्या बाल्यावस्थेंत हें खातें यंदाच्या जानेवारीपासून पुनः बंद करण्यांत आलें. एवढ्या अवधींत या खात्यानें साखर, गूळ, आंबे, सफरचंद व काजू हा माल खपविण्याच्या दृष्टीनें पाहणी केली. पुण्याच्या आजूबाजूस भाजीपाला विक्रीच्या दृष्टीनें सोसायट्या काढण्याकरितां पाहणी केली. धंद्याच्या वाढीच्या दृष्टीनें, बाजारभावाची माहिती वगैरे गोष्टींची माहिती या खात्यानें जमविली. त्याचप्रमाणें या खात्यामार्फत १९३९-४० सालीं ३००० पेक्षां जास्त प्रात्यक्षिकें झालीं, सुमारें दहा लक्ष पौंड चांगल्या प्रतीचें बीं शेतकऱ्यांना या खात्यानें दिलें आणि मागसलेल्या भागांतून धान्याचीं कोठारें जोरानें सुरू करून, १७१ कोठारें उघडलीं व सुमारें एक हजार गावांना कोठारांचा फायदा दिला.

सर्वांगीण ग्रामसुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीनें हें खातें सर्वस्वीं जबाबदार होतें व त्यासाठी नाना तऱ्हेनें पाहणी करून निरनिराळ्या योजना या खात्यामार्फत तयार होत होत्या. हें खातें अधिक काळ टिकलें असतें तर त्याचा उपयोग लक्षांत आला असता व ग्रामसुधारणेच्या प्रगतीवरून या खात्याचे गुणदोष कळले असते. परंतु सरकारनें घाई करून अवघ्या दीड वर्षानंतरच हें खातें बंद केलें व त्याचीं छकलें केलीं. त्यामुळें आतां ग्रामसुधारणेच्या निरनिराळ्या अंगांची जबाबदारी वेगवेगळ्या खात्यांकडे पुन्हां गेली आहे. आतां ग्रामसुधारणेचें काम हें सर्वांचें काम होऊन बसलें आहे. या दृष्टीनें ग्रामसुधारणेचें जबाबदार खातें अधिक दिवस टिकलें असतें तर बरें झालें असतें.

—' शेती आणि शेतकरी '


# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबअी शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | : रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल | : रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | : रु. ३,७९,७०० |
| वसूल झालेलें भांडवल | : रु. १,८९,८५० |
| एकूण खेळतें भांडवल | : रु. ३१,००,००० |

**डायरेक्टर्स**

प्रो. वा. गो. काळे, अध्यक्ष

| | |
|---|---|
| श्री. धों. कृ. साठे | श्री. मा. रा. जोशी |
| श्री. न. ग. पवार | श्री. श्री. गो. मराठे |
| श्री. त्र्यं. वि. रानडे | श्री. र. चिं. सोहोनी |
| श्री. वा. पु. वर्दे | मि. फ. वो. पदमजी |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदीविक्री कसोशीनें करून दिली जाते.

बँकेच्या शेअरवर १९४० अखेर पुऱ्या होणाऱ्या वर्षी द. सा. द. शेंकडा ४ टक्के करमाफ डिव्हिडंड दिलें गेलें. बँकेची शेअरविक्री चालू आहे.

म. वि. गोखले
मॅनेजर.






# मधुमेहावरील औषध

तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७

— मागविण्याचा पत्ता —

मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्ट्स कंपनी लिमिटेड.

९२३ ए, सदाशिव, पुणें २.



# K. K. & Co.

Photographic Dealers

POONA.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% करमाफ लोन ( १९४५-५५ ) ... ... | ११९—१ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०४—४ |
| ३½% विनमुदत ... ... ... ... | ९६—० |
| ३½% १९४७-५० ... ... ... | १०२-१२ |
| ३% ( १९६३-६५ ) ... ... ... | ९५—० |
| २¾% १९४८-५२ ... ... ... | ९७—८ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०८—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०७—८ |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३-६३ ) — .. | ११५—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... — | १२५—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% ... ... | १४३—० |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% ... ... | १०९—८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ४५—४ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५८२—८ |
| मुंबई प्रॉ. को. बँक ( ५० ) २ रु. ... ... | ५३—८ |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५—४ |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५०, ३३% ... ... | १३२-१२ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | २१३-१२ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | २१३-१२ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १५८५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १६२०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०४—८ |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) १½% ... ... | ६१—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | ८९२—८ |
| तापी व्हॅली ( १०० ) ८% ... ... ... | ६४५—० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) १० रु. ... ... ... | २०१—८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. ... ... | ४४—० |
| शिंदिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | १९-१४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. ८ आ. ... | ४६—० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४२०२—८ |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २१५-१० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. ... | १५४—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३३१—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | ११९५—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. ... | १४४—८ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिक्स ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२-२-३ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ६३-०-० |


मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग ९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १८ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १९ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | २० धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | २१ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २२ शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २३ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २४ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २५ साक्री ( „ „ ) |
| ९ वांई ( „ „ ) | २६ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २७ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २८ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २९ सटाणा ( „ „ ) |
| १३ बेलापूर ( „ „ ) | ३० कळवण ( „ „ ) |
| १४ राहुरी ( „ „ ) | ३१ लासलगांव ( „ „ ) |
| १५ भिवंडी ( „ ठाणें ) | ३२ नांदगांव ( „ „ ) |
| १६ पालघर ( „ „ ) | ३३ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १७ कल्याण ( „ „ ) | ३४ कालोल ( „ „ ) |

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात आणि इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

राहणेची व भोजनाची उत्तम सोय




फोन नं. ७७९ गणपती चौक व्यवस्थापक

तमाम दंतरोगांचा नाश करून दांत अती स्वच्छ व बळकट ठेवणारी सर्वांत उत्तम!
पोरवाल
ब्लॅक टूथ पावडर
पोरवाल ॲन्ड को (रजिस्टर्ड) पूनासिटी




सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
**जर्निमन टेलर व्हा.**
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
**पराडकर टेलर्स ॲकेडिमी,** ६७१ सदाशिव, पुणें.

**N. V. WADNERKAR**

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver,
Electro-plater & Manufacturer of Sporting
Trophies, Medals, Cups etc.
- - Raviwar Peth, Saraff Bazar, - -
POONA CITY.


## अर्थशास्त्र

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे
पृष्ठसंख्या सुमारें ३००; किंमत ३ रुपये
या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली


**महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.**

बंबाचे माडीवर

# महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

दुसरी आवृत्ति

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ताः—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

# रिसबूड ब्रदर्स, टेलर्स

वक्तशीरपणा व फिटिंग ह्याची गॅरंटी

Prop. M. V. Risbud, B. A.
सदाशिव पेठ हौदानजीक, पुणें २.

महिलांचे भरतकाम व विणकामाच्या सामानाचें दुकान

# एम्ब्रॉयडरी मार्ट

६१६, शनवार पेठ, पुणें २.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद् वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. ९२७।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.